सत्यमेव जयते

STATE ELECTION COMMISSION MAHARASHTRA

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/स्था.आ/ग्रापनि-२०१७/प्र.क्र. १३/का. ८
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२,
दिनांक: १३ /०३/ २०२३

प्रति,
मा. विभागीय आयुक्त (सर्व)

**विषय:** ग्रामपंचायत निवडणूकीच्या कामकाजाबाबत विभागीय आयुक्त स्तरावर नोडल अधिकारी म्हणून उप-आयुक्त (विकास - नियोजन/आस्थापना) यांची नेमणूक करण्यासंदर्भात आदेश.

**संदर्भ:** १) आयोगाचे समक्रमांकाचे दि. २९/०७/२०१७ रोजीचे निर्देशपत्र.

२) आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि- २०२३/प्र.क्र. १२/का-८, दि. २०/०२/२०२३ रोजीचे आदेश व दि. २३/०२/२०२३ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना.

३) आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि- २०२३/प्र.क्र. १२/का-८, दि. २४/०२/२०२३ रोजीचे आदेश.

महोदय,

ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९९८ च्या अधिनियमाच्या कलम १० मध्ये केलेल्या दुरूस्तीनुसार ग्रामपंचायत प्रभाग रचनेस मान्यता देण्याचे राज्य निवडणूक आयोगास दिलेले अधिकार उक्त संदर्भ क्र. २ च्या आदेशाद्वारे संबंधीत विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच, या संदर्भात ग्रामपंचायतींची विभागवार असलेली मोठी संख्या लक्षात घेवून उक्त संदर्भ क्र. ३ च्या निर्देशपत्राद्वारे आयोगाने संबंधीत विभागीय आयुक्त यांना ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचे काम हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व उपायुक्तांकडे शक्यतो समप्रमाणात विभागून देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत आणि,

ज्याअर्थी, विभागीय आयुक्त कार्यालयात ग्रामपंचायतीसह जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या शासनाच्या ग्रामविकास विभागाशी संबंधीत संदर्भातील प्रशासकीय कामकाजाच्या बाबी उप-आयुक्त स्तरावरील विकास शाखेतील नियोजन किंवा आस्थापना विषय हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेले असतात,

त्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगास भारतीय संविधान तसेच उक्त ग्रामपंचायत अधिनियमाद्वारे प्रदानित करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून खालीलप्रमाणे आदेश देत आहेत:-

<u>आदेश</u>

(१) उक्त संदर्भ क्र. ३ च्या आयोगाच्या दि. २४/०२/२०२३ च्या पत्रात दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींच्या निवडणूक कामकाजामध्ये शासन तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर उचित समन्वय साधण्याच्या दृष्टीकोनातून आयोगाने वरील संदर्भीय क्र. १ अन्वये जारी केलेल्या दि. २९/०७/२०१७ च्या आदेशात अंशत: बदल करण्यात येत असून त्यानुसार ग्रामपंचायत निवडणूकांच्या कामकाजासंदर्भात सदर आदेशात नमूद केलेल्या सर्व मुद्यांसंदर्भात विभागीय आयुक्त स्तरावर संनियंत्रण अधिकारी/नोडल अधिकारी म्हणून उप आयुक्त (विकास) किंवा उप आयुक्त (आस्थापना) यांची नेमणूक संबंधीत विभागीय आयुक्तांनी करावी.

(२) या आदेशानुसार उप आयुक्त (विकास) किंवा उप आयुक्त (आस्थापना) हे विभागीय पातळीवर संनियंत्रण/नोडल अधिकारी म्हणून संबंधीत विभागीय आयुक्त कार्यालयातील इतर उप आयुक्त यांच्याशी ग्रामपंचायत निवडणूकासंदर्भात समन्वय साधून राज्य निवडणूक आयोगास नियमितपणे अहवाल सादर करणे तसेच आयोगाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या बैठकांमध्ये विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणे, यासाठी जबाबदार असतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

आपला,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत: १) मा. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन.
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.
५) निवड नस्ती.